# वसई विरार शहर महानगरपालिका

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९ सभा सुचना क्र. १५ दिनांक : २/५/२०११

**विषय:-** **वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील मुदतीत मालमत्ता कर भरणाऱ्या कर धारकांना मालमत्ता करांत सुट देणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

**प्रस्तावाचा मजकूर -** वसई-विरार शहर महानगरपालिका स्थापनेपुर्वी तत्कालीन वसई, विरार, नालासोपारा व नवघर-माणिकपूर या नगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांना मालमत्ता कराची बिले बजावले नंतर संबंधित मालमत्ता धारकांनी या कामी विहीत मुदतीत कर भरणा केला असता एकूण मालमत्ता कराच्या रक्कमेच्या १% प्रमाणात त्यांना सूट देण्यांत येत होती.

दिनांक ३ जुलै २००९ रोजी सदर चार नगरपरिषदा व शेजारील ५३ गावांसह वसई-विरार शहर महानगरपालिका नव्याने स्थापन झाली आहे. महानगरपालिका स्थापनेनंतर आजता गायत सदर चार नगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांना विहीत मुदतीत कर भरणा केल्यास वर नमुद केलेप्रमाणे सूट देण्याचे थांबविणेंत आले आहे.

महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती अधिनियम १९६५ या मध्ये सुधारणा करुनतसे राजपत्र दि. १४ जानेवारी २००९ रोजी प्रसिद्ध केले आहे व त्या अनुषंगाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४० अ नुसार संबंधित मालमत्ता धारकांनी मालमत्ता कराचे बिलात नमूद केलेल्या दिनांकापुर्वी बिल रक्कम भरणा केल्यास महानगरपालिकेची सर्व साधारण सभा मंजूरी देईल अश्या दराने मालमत्ता वापर कर्त्यांच्या वेगवेगळया वर्गाकरीता संबंधितांनी विहीत मुदतीत कर भरणा केल्यास वेगवेगळया दराने मालमत्ता धारकांना सूट देता येईल अशी तरतूद करणेंत आली आहे.

**प्रस्तावाचा निर्णय :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत येऊन वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील मालमत्ता धारकांना बिल दिल्यानंतर मुदतीस मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना १% सुट देण्याबाबत निर्णय ही सभा सर्वानुमते घेत आहे.

सही/-
सूचक:- (नारायण मानकर)

सही/-
अनुमोदक:- (विनायक निकम)

ठराव सर्वानुमते मंजूर,

सही/-
महापौर तथा पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

सत्य प्रत
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका